जनसंपर्क कक्ष
0 7 SEP 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी संशोधनात योगदान द्यावे

## डॉ. ए. एम. गुरव : कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या वतीने शिक्षक दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अलीकडच्या काळामध्ये शिक्षकांचे संशोधनामधील योगदान दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांनी संशोधनामध्ये स्वतःला वाहून घेऊन देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या वतीने शिक्षक दिनी आयोजित समारंभात 'संशोधनामधील करिअर आणि फंडिंग एजन्सीज' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते.



कोल्हापुरातील कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या वतीने शिक्षक दिन कार्यक्रमात डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, पार्वती देवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग या महाविद्यालयांतील उत्कृष्ट शिक्षक डॉ. एस. बी. राजमाने प्रा. अश्विनी मगदूम, डॉ. महेंद्रकुमार जाधव, प्रा. पूजा चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. मिळाल्याबद्दल डॉ. सीमा बेनाडे यांचा व सेट परीक्षा पास झाल्याबद्दल शर्मिला पोवार, प्रा. कार्तिक यांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. अशोक बन्ने, प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे, प्राचार्य भालचंद्र कुलकर्णी उपस्थित होते. (वा. प्र.)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
लोकमत

# विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षा १६ ऑक्टोबरपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील ऑक्टो. /नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षा येत्या १६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. पदवी, पदव्युत्तर कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, सर्व डिप्लोमा सर्टिफिकेट, बी. व्होक., अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, टेक्सटाइल, बी.टेक, विधि, एमबीए यांसह विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होणार आहेत. बी.ए. प्रथम वर्षाची परीक्षा दि. १६ ऑक्टोबरपासून सुरू होईल. सकाळ व दुपारी अशा दोन सत्रांत या परीक्षा होणार आहेत. या सत्रात ८६५ परीक्षा होणार असून, यामध्ये अडीच लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षा देणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

07 SEP 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांवरील अत्याचाराच्या विरोधात नागरिकांनी ठोस भूमिका घ्यावी

## ॲड. रमा सरोदे; शिवाजी विद्यापीठात महिला सन्मान परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महिलांना संरक्षण मिळावे म्हणून अनेक कायदे केले असले तरी समाजाचा सक्रिय सहभाग नसेल, तर कायद्याची अंमलबजावणी प्रभावी होणार नाही. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधात कायदा काम करेल; परंतु नागरिकांनी सजग राहून हिंसाचाराच्या विरोधात ठोस भूमिका घेतली पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ॲड. रमा सरोदे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा मास कम्युनिकेशन विभाग व अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आयोजित स्त्री सन्मान परिषदेत त्या बोलत होत्या. 'लैंगिक हिंसा, कायदा आणि आपली जबाबदारी' या विषयावर ॲड. सरोदे यांनी भूमिका



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्त्री सन्मान परिषदेत बोलताना ॲड. रमा सरोदे.**

मांडली. त्या म्हणाल्या, गेल्या काही काळात महिला व लहान मुलांवरील अत्याचारांत वाढ झाली आहे. अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या, अशी मागणी जोराने होत आहे. फाशीच्या शिक्षेबाबत अनेक मतप्रवाह आहेत. तथापि, हिंसाचाराची घटना घडल्यानंतर तातडीने शिक्षा व्हायला हवी.

स्त्री प्रश्नाचे अभ्यासक मिलिंद चव्हाण म्हणाले, भारत-पाकिस्तानच्या फाळणीवेळीही महिलांवर खूप अत्याचार झाले. जात पितृसत्ताक व्यवस्थेत पहिला बळी महिलेचाच जातो. महिलांचे वस्तूकरण होत असून, अगदी लहान मुलींवरही अत्याचार होताना दिसत आहेत. व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजेत व समाज म्हणून आपण महिलांप्रती आदरभाव जोपासला पाहिजे. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, अंनिसचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष रेश्मा खाडे, कृष्णात स्वाती, डॉ. अरुण शिंदे, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
पुढारी

# अभियांत्रिकीसह इतर विद्या शाखांच्या विद्यार्थ्यांना मिळणार 'कॅरी ऑन'

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

अभियांत्रिकीसह इतर विविध विद्या शाखांच्या विद्यार्थ्यांना 'कॅरी ऑन' देण्यासंदर्भात विद्या परिषदेच्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत बीए, बीकॉम, बीएससी परीक्षा संदर्भात प्राचार्य संघटनेने दिलेल्या पत्रावर चर्चा झाली.

पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षातील प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड लावणे बंधनकारक केले आहे. विद्यार्थ्यांनी झाडाचे जिओ टॅगिंग करण्याबरोबरच पर्यावरण प्रकल्प अंतर्गत याची माहिती सादर करावी लागणार आहे. यास विद्या परिषदेत मान्यता देण्यात आली. राज्यशास्त्र विभागात विमेन पॉलिटिकल लिटरसी या नवीन सर्टिफिकेट कोर्सला मान्यता देण्यात आली.

पीजी डिप्लोमा इन प्रोसेस सेफ्टी मॅनेजमेंटला मान्यता दिली गेली. स्वयं पोर्टल अंतर्गत विद्यार्थ्यांच्या हितासाठी आवश्यक गोष्टी असल्याने त्यास मान्यता देण्यात आली. अतिरिक्त तुकड्या, महाविद्यालयाचे संलग्निकीकरण, नूतनीकरण, विस्तार आदी प्रस्तावांना विद्या परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

07 SEP 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण' ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची बी. ए., बी. कॉम, एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी (गणित) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ८ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सर्व अभ्यासक्रम यूजीसी मान्यताप्राप्त आहेत. त्यामुळे शिक्षणापासून वंचित, शिक्षण अपूर्ण आहे, शिवाय महाविद्यालयास तुकडी मान्यता न मिळाल्याने, रीपिटर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्या आदींनी आपला प्रवेश निश्चित करावा. शिवाजी विद्यापीठाच्या www. unishivaji. ac. in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध असून https:/// sukapps. unishivaji.ac.in/ stud-reg/#/ login या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ-'सारथी' यांच्यात सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्यादरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये हा करार करण्यात आला. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, हा सामंजस्य करार समाजास आणि संशोधक विद्यार्थी वर्गाला उपयुक्त ठरेल.

याप्रसंगी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे उपकेंद्र कोल्हापूरतर्फे व्यवस्थापकीय संचालक किरण कुलकर्णी, सारथी उपकेंद्र, कोल्हापूर येथील संशोधन अधिकारी नयन गुरव, प्रकल्प अधिकारी दीपक पाटील उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
पुण्यनगरी

# शिक्षकांनी संशोधनामध्ये योगदान द्यावे : डॉ. गुरव

कोल्हापूर : सर्व शिक्षकांनी संशोधनामध्ये स्वतःला वाहून घेऊन देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या वतीने आयोजित शिक्षक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम होते. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, पार्वती देवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग येथक्षल उत्कृष्ट शिक्षक डॉ. एस. बी. राजमाने, प्रा. अश्विनी मगदूम, डॉ. महेंद्रकुमार जाधव, प्रा. पूजा चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. तर शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. मिळाल्याबद्दल डॉ. सीमा बेनाडे, सेट परीक्षा पास झाल्याबद्दल शर्मिला पोवार, प्रा. कार्तिक यांचा सत्कार करण्यात आला. प्र. प्राचार्य डॉ. अशोक बन्ने, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे, प्राचार्य भालचंद्र कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
07 SEP 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दूरशिक्षण'साठी प्रवेशास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरू आहे. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम.एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस दि. ८ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

डॉ. मोरे म्हणाले, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सर्व अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता प्राप्त आहेत.



विद्यार्थ्यांना एकूण ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून प्रवेश निश्चित करता येतो. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचा ही लाभ मिळणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी दि.३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच एम.बी.ए.(डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा दि. २२ सप्टेंबर रोजी असल्याने प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची अंतिम दि. २० सप्टेंबर आहे.

## मुद्रितशोधन अभ्यासक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे 'मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम' राबवला जात आहे. यासाठी दि. ३० सप्टेंबरपूर्वी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेता येईल, अशी माहिती मराठी विभागातर्फे देण्यात आली. या नव्या लिंकवरून सर्व प्रक्रिया कमीत कमी वेळात पूर्ण करून घेता येईल.

0 7 SEP 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


डॉ. सागर डेळेकर


प्रा. प्रकाश पवार


डॉ. प्रशांत पाटील


प्रा. प्रमोद कोयले


डॉ. सतीश पाटील


डॉ. विजय घोडके

# अँटिमायक्रोबियल सेन्सर, सौर-उपकरणाला तीन पेटंट

## शिवाजी विद्यापीठातील सहा संशोधकांचे यश

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : नॅनो संमिश्रे आधारित सौर उपकरण, बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणे तसेच वायू पदार्थ संवेदन (गॅस-सेन्सर) याविषयी शिवाजी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील संशोधकांनी केलेल्या संशोधनाला दोन जर्मन आणि एक युके पेटंट मिळाले. विद्यापीठातील डॉ. सागर डेळेकर (रसायनशास्त्र अधिविभाग), डॉ. प्रमोद कोयले (स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी), डॉ. प्रशांत पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग), प्रा. विजय घोडके (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी), प्रा. प्रकाश पवार (यशवंतराव पाटील सायन्स महाविद्यालय सोळांकूर), डॉ. सतीश पाटील (कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी) यांनी पेटंट मिळविण्याची यशस्वी कामगिरी केली.

### वायू संवेदना तंत्रज्ञानाचा विकास

■ **या संशोधकांनी आमोनिया वायू संवेदनासाठी अशाच नॅनो संमिश्रे आधारित नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्याला यूके पेटंट मंजूर केले आहे. हे प्रगत उपकरण अतिसंवेदनशील आहेत. ज्यामुळे ते अमोनियाच्या अगदी लहान प्रमाणावरही देखरेख प्रभावीपणे ठेवू शकतात. शेती आणि साफसफाईसारख्या उद्योगांमध्ये सुरक्षिततेसाठी हे महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. डेळेकर यांनी सांगितले.**

सौर ऊर्जेच्या रूपांतरणासाठी धातू ऑक्साईड-आधारित नॅनोसंमिश्रे विकसित करण्यासाठी आमचे संशोधन सुरू आहे. दैनंदिन जीवनात बॅक्टेरिया, विषाणू, बुरशी, आदी सूक्ष्म जीवजंतू सर्वत्र आढळतात, जे वातावरणात दुर्गंधी व अस्वच्छता पसरण्याचा कारणीभूत ठरतात. असे सूक्ष्म जीवजंतू मानवी शरीरामध्ये प्रवेश करून अनेक संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता खूप असते. किंबहुना मधुमेही, बीपी रुग्णांना अशा जीवजंतूचा संसर्ग लवकर होऊन त्यांची प्रतिकार क्षमता दिवसेंदिवस कमी होत जाते. म्हणून या सूक्ष्म जीवजंतूचा प्रसार व पुनरुत्पादन रोखण्यासाठी प्रा. डेळेकर व त्यांचा संशोधक विद्यार्थी प्रा. घोडके यांनी धातू ऑक्साईड नॅनोसंमिश्रे-आधारित प्रतिजैविक घटक बनविले आहेत. ज्याचा उपयोग निश्चितः जीवाणूजन्य संसर्ग व संक्रमणाचा धोका टाळण्यासाठी केला जाऊ शकतो.

07 SEP 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिंसाचाराविरुद्ध नागरिकांनी ठोस भूमिका घ्यावी

## ॲड. रमा सरोदे : शिवाजी विद्यापीठात महिला सन्मान परिषद

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : महिलांवर अत्याचार करणाऱ्यांविरोधात कायदा आपले काम करेलच. पण, नागरिकांनाही सजग राहून हिंसाचाराच्या विरोधात ठोस भूमिका घ्यावी, असे आवाहन पुण्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ॲड. रमा सरोदे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा मास कम्युनिकेशन विभाग आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) कोल्हापूरतर्फे वि. स. खांडेकर भाषा भवनात आयोजित महिला सन्मान परिषदेत त्या बोलत होत्या. स्त्री प्रश्नांचे अभ्यासक मिलिंद चव्हाण, मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, अंनिसचे राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष रेश्मा खाडे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभाग आणि अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) कोल्हापूरतर्फे आयोजित महिला सन्मान परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी रमा सरोदे, मिलिंद चव्हाण, जगदीश काबरे, रेश्मा खाडे, शिवाजी जाधव, संजय बनसोडे, अभिषेक मिठारी, कृष्णात स्वाती उपस्थित होते.

'लैंगिक हिंसा, कायदा आणि आपली जबाबदारी' या विषयावर ॲड. सरोदे यांनी भूमिका मांडली. गेल्या काही काळात महिला आणि लहान मुलांवरील अत्याचारात वाढ झाली आहे. अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या, अशी मागणी जोराने होत आहे. फाशीच्या शिक्षेबाबत अनेक मतप्रवाह आहेत. तथापि, हिंसाचाराची घटना घडल्यानंतर तातडीने शिक्षा व्हायला हवी. यामध्ये कालापव्य होता कामा नये, असा लोकांचा आग्रह असला पाहिजे. गुन्हेगाराला तातडीने शिक्षा होते, असा संदेश गेल्यास गुन्हे घडण्याचे प्रमाण कमी होईल, असे त्यांनी सांगितले.

साम्राज्यवादी व्यवस्था आणि युद्धजन्य स्थितीत महिलांवर सर्वाधिक अत्याचार झाल्याचे इतिहास सांगतो. भारत-पाकिस्तानच्या फाळणीवेळीही महिलांवर खूप अत्याचार झाले. जातपितृसत्ताक व्यवस्थेत पहिला बळी महिलेचाच जातो. महिलांचे वस्तूकरण होत असून, अगदी लहान मुलींवरही अत्याचार होताना दिसत आहेत. वंशवाद, जातीयवाद, धर्मवाद, वर्णवर्चस्ववाद या सगळ्या व्यवस्था स्त्रियांचे शोषण करतात. या व्यवस्थेला प्रश्न विचारले पाहिजेत. समाज म्हणून आपण महिलांप्रती आदरभाव जोपासला पाहिजे, असे चव्हाण यांनी सांगितले. या परिषदेत विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रमुख उपस्थितांनी सविस्तर उत्तरे दिली. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, कृष्णात स्वाती, डॉ. अरुण शिंदे, अनमोल कोठाडीया, सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते. जयप्रकाश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
सकाळ

# 'डॉ. आर. व्ही. भोसले' पारितोषिकासाठी विद्यापीठाला दीड लाखाची देणगी

कोल्हापूर, ता. ६ : जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. राजाराम विष्णू तथा आर. व्ही. भोसले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शैक्षणिक पारितोषिक देण्यासाठी त्यांच्या पत्नी विजया भोसले यांनी शिवाजी विद्यापीठाला दीड लाख रुपयांची देणगी दिली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे त्यांनी मंगळवारी या देणगीच्या रकमेचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य शशिकांत शिंदे, पंजाबराव भोसले, डॉ. विजय मारुलकर, शिवप्रकाश भोसले उपस्थित होते.

विद्यापीठाच्या खगोलशास्त्र विभागाचे माजी प्रमुख असलेल्या डॉ. भोसले यांचे सन २०२० मध्ये वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे खगोलशास्त्रातील संशोधन जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त होते. भारताचा पहिला रेडिओस्कोप तयार करण्याची कामगिरी त्यांच्या नावावर आहे. डॉ. भोसले यांच्या स्मृती शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून चिरंतन राहाव्यात, यासाठी त्यांच्या पत्नी विजया भोसले यांनी पदार्थविज्ञान विभागातील एम. एस्सी. भाग-दोन खगोलविज्ञान या विषयात प्रथम आणि द्वितीय येणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीस 'डॉ. राजाराम वि. भोसले स्मृती पारितोषिक' देण्याचा निर्णय घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 SEP 2024
सकाळ

# विद्यार्थ्यांनी चाणाक्ष वृत्तीने संधीचा शोध घेतला पाहिजे : डॉ. वर्षा मैंदर्गी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रसाराच्या काळामध्ये शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. विद्यार्थ्यांनी चाणाक्ष वृत्तीने चांगल्या संधीचा शोध घेतला पाहिजे, असे प्रतिपादन व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागामार्फत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन व माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार होत्या. पल्लवी कांबळे, ऐश्वर्या मुरुथवर, नेहा लाटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रूपाली संकपाळ, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, सारिका पाटील, संगीता चंदनवाले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
सकाळ

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस रविवारपर्यंत (ता. ८) मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. एम. बी. ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा २२ सप्टेंबरला असल्याने प्रवेश परीक्षा अर्ज करण्याची अंतिम २० सप्टेंबर आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मोरे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 SEP 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या परीक्षा १६ ऑक्टोबरपासून

कोल्हापूर, ता. ६ : कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर) पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा १६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. यादिवशी बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी. अभ्यासक्रमांपासून परीक्षांचा प्रारंभ होणार आहे. त्याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आज जाहीर केले .

गेल्या सत्रापर्यंत पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या, दुसऱ्या वर्षांच्या परीक्षा संलग्नित महाविद्यालय, तर तृतीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाकडून घेतल्या. मात्र, महाविद्यालयांकडील या परीक्षांबाबत काही मुद्दे उपस्थित झाल्याने विद्यापीठाने पदवीच्या तिन्ही वर्षांच्या परीक्षा आपल्या माध्यमातून घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आता हिवाळी सत्रातील परीक्षा होणार आहे. विविध अभ्यासक्रमांच्या ८६५ परीक्षा होणार आहे. अशी माहिती या मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.